ISSN: 2347-2723 IMPACT FACTOR : 2.0260(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | MAY - 2017

REVIEW OF LITERATURE

# महाराणी ताराबाईकालीन कोल्हापूर – पोर्तुगीज संबंध 1700 ते 1714

डॉ.तुकाराम नारायण शिंदे
इतिहास विभाग
अे.आर.बुर्ला महिला महाविदयालय,सोलापूर.

## प्रस्तावना

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर इंग्रज सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या सत्ता स्थापन झाल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज ,राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या काळात या सत्तांचा मराठा सत्ताबरोबर संबंध आला. यापैकी पोर्तुगीज आणि मराठा संबंध महत्वाचे ठरले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांना पोर्तुगीजांबरोबर संघष करावा लागला. पण कोल्हापूरची गादी निर्माण झाल्यांनतर महाराणी ताराबाईकाळातील पोर्तुगीजांबरोबरील संबंध महत्वाचे ठरले. प्रस्तुत शोधनिंबधात या संबंधाचा शोध घेतला आहे.

इ. स. 15 व्या शतकात युरोपीय देशात नवीन क्रांती होऊन मानवी जीवनाला एक नवीन वेगळे वळण मिळाले.

युरोपातील अनेक देशांनी भारताशी व्यापारी संबंध ठेवले. त्यामध्ये 16 व्या शतकाच्या प्रारंभी पोर्तुगीज आले. त्यानंतर डच, इंग्रज फ्रेंच आले. प्रथम व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या पोर्तुगीजांने व्यापारासोबत राजकारणात प्रवेश करण्यास सुरूवात केली. व्यापार करून नफा मिळविण्याच्या उद्देशाने ते भारतात आले असले तरी नंतर ते राजकारणात गुंतत गेले.

इ. स. 1510 मध्ये पोर्तुगीज राज्याचा ' संस्थापक मानला जाणारा अल्फान्सो अल्बुकर्क ने आदिलशहाकडून 'गोवा' प्रांत जिंकून घेतला. त्यानंतर पश्चिम किनारपट्टीवरील मुंबई, दीव, दमण, साष्टी, वसई, चौल इ. प्रदश जिंकल्यामुळे शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज यांचे संबंध आले.

संस्थापक मानला जाणारा अल्फान्सो अल्बुकर्क ने आदिलशहाकडून 'गोवा' प्रांत जिंकून घेतला. त्यानंतर पश्चिम किनारपट्टीवरील मुंबई, दीव, दमण, साष्टी, वसई, चौल इ. प्रदश जिंकल्यामुळे शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज व पोर्तुगीज यांचे संबंध आले. सर्व युरोपीय राष्ट्रे प्रामुख्याने भारताबरोबर व्यापार संबंध वाढवण्यास इच्छुक होती व म्हणुनच त्यांनी त्या प्रकारचे उद्योग भारतात सुरू केले

शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामर्थ्याची आणि लष्करी हालचालीची कल्पना पोर्तुगीजांना असल्याने त्यांनी त्यांच्या आरमारात अनेक अडचणी निर्माण केल्या त्यामुळे मराठे व पोर्तुगीज संबंध बिघडले.



शककर्ते छ. शिवाजी महाराजानंतर स्वराज्य संभाजी महाराजांच्या काळात मर्यादीत झाले होते. राजाराम महाराजांच्या काळात ते नव्याने उभे राहत असतानाच त्यांचा दुर्देवाने मृत्यू झाला. पुढे मराठयांचे राज्य संघटीत करण्याचे कार्य महाराणी ताराबाईने केले. परंतु शाहूला शह देण्यासाठी पोर्तुगीजांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले.

### ताराबाईच्या राजवटीचा टप्पा (इ.स. 1710 ते 1714) :–

मराठयांच्या राजकीय घडामोडीकडे पोर्तुगीजांचे बारीक लक्ष असे. शाहू आणि ताराबाई यांच्या संघर्षाकडे ते सावधगिरीने परंतु बारीक लक्ष ठेवून होते. मराठ्यांच्या सत्तेत यादवी संघर्ष होऊन त्याचा फायदा पोर्तुगीजांना मिळेल अशी अपेक्षा त्यांना होती. जर दोन्ही पक्षात संघर्ष झाला नसता तर आम्हाला सदैव शस्त्र घेऊन उभे राहावे लागले असते असे पोर्तुगीज म्हणतात. शाहू–ताराबाई यांच्या संघर्षामुळे दोन्ही पक्ष दुर्बळ होतील असे त्यांना वाटत होते.

पश्चिम किनाऱ्यावर आपलाच प्रभाव राहावा यासाठी पोर्तुगीज प्रयत्न करत होते. त्यांना सर्वात मोठे शत्रू कोल्हापूरकर वाटत होते. कोल्हापूरचे आरमार मालवण मध्ये प्रभावी होते. तेथून जवळच गोवा असल्याने पोर्तुगीज व कोल्हापूर आरमाराचा संबंध येत असे.

पार्तुगीज –इंग्रज आणि डच यांना येथील सत्ताधीशांनी व्यापाराकरीता म्हणुन वखारी स्थापन करण्यासाठी मोठया प्रमाणात जमिनी वापरण्याचे फर्मान दिले होते.

उत्तर किनाऱ्यावरील आरमाराचे प्रमुख कॅप्टन दों आंतेनियु द मिनेझिश यांना 18 डिसेंबर 1703 रोजी पोर्तुगीजवरून आलला एक हुकूमनामा जो मराठयाशी धोरण कसे असावे ? याविषयी आहे ''मराठ्यांची जहाजे दिसली तर त्यांना मित्रत्वाची वागणूक द्यावी. मात्र योग्य ती सावधगिरी बाळगून व मित्रत्वाचा बहाणा करून ही कामगिरी बजावावी. आमच्याकडे शांततेने व मत्रीने वागण्याची मराठ्यांची इच्छा आहे असे दिसून आल्यास ते श्रेयस्कर आहे. तथापि त्यांच्या नवीन अटी पुढे आल्या तर काही विशिष्ट कारणास्तव हे मैत्रीचे संबंध बिघडले तरी हरकत नाही.''

वरील हुकूमनामा पोर्तुगीजांनी आपल्या आरमाराला पाठवला होता. यावरून त्यांचे मराठे विषयीचे धोरण संधीसाधूपणाचे होते हे स्पष्ट दिसते. हे धोरण ताराबाईला तत्कालीन परिस्थितीत समजले नव्हते याचे कारण महाराणी ताराबाईंनी पोर्तुगीजांकडे शाहू विरोधात तहाची बोलणी केली होती. एवढेच नव्हे, तर ताराबाईंनी गोव्याच्या हॉईसरॉयला आपल्याशी मित्रत्वाचे संबंध ठेवण्याची इच्छा दर्शविली होती.

महाराणी ताराबाईंनी मोगलांषी संघर्ष करून स्वराज्य टिकवून ठेवले त्यांना पोर्तुगीजांचे धोरण ओळखता येत नव्हते असे नसून फक्त शाहूला शह दण्यासाठी ताराबाईने पोर्तुगीजांशी तहाची बोलणी केली.

10 डिसेंबर 1708 रोजी विजरईने पोर्तुगालच्या राजास पत्रातुन ताराबाई आणि शाहुराजेंच्या परिस्थितीची माहिती दिली. त्यात तो म्हणतो. '' आपणाकडे दोघांनीही तहाची मागणी केली. त्यांच्या युध्दामध्ये शाहूराजास जय मिळवण्याची अधिक शक्यता आहे. कारण त्यांचे सैन्य मोठे आहे व त्यासखुद्द ताराबाईचे लोक येऊन मिळत आहेत. तरी परिस्थितीनुसार आपण वागण्याचे योजिले आहे ''

ताराबाई–शाहू संघर्षात दोन्ही पक्ष दुर्बळ होऊन त्याचा फायदा आपणास मिळेल अशी भावना पोर्तुगीजांची होती. पोर्तुगीज मराठयांशी दुटप्पी धोरणाने वागत होते. एका बाजूला करवीर महाराणी ताराबाई यांच्याशी तह करत होते. तर दुसरीकडे शाहूषी मैत्रीचा तह करून दारूगोळा व इतर वस्तूंची मदत केली. ताराबाई या शाहूषी लढा देण्यासाठी पोर्तुगीजांची मदत मिळवू इच्छित होत्या. परंतु पोर्तुगीजांशी त्यांचा तह झाला नाही. बहुदा शाहूने महाराष्ट्रात आल्यावर ताराबाईवर जे विजय मिळविले त्यामुळे पोर्तुगीजांनी ताराबाईषी मैत्रीचा करार करण्याबाबत माघार घेतली असावी. त्यातच मालवणच्या किल्लेदाराचे व गोवेकरांचे इ. स. 1714 पर्यंत सलोख्याचे संबंध नव्हते. ताराबाईंशी पोर्तुगीजांनी तह केला नाही. त्यामुळे चिडून ताराबाईंने गोव्यात आपले सैन्य धाडण्याची योजना आखली. मात्र ती यशस्वी होऊ श्कली नाही.

अशा प्रकारे ताराबाई व शाहू यांच्यातील संघर्षाचा फायदा पोर्तुगीज स्वतःच्या स्वार्थासाठी करून घेत होते हे स्पष्ट दिसते.

## संदर्भ साधनांची यादी

1.शिखरे सु.व.,पोर्तुगिज –मराठा सामरिक संबंध(1700 –1710),इतिहास सशोधन पत्रिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. 2015.
2.परेरा. ए. जी., ॲन आऊटलाईन ऑफ–पोर्तुगीज हिस्ट्री ऑफ गोवा, ग्रेल्ड परेरा, पणजी, 1973.
3. व्हाईट अव्हे आर. एस., द राईज ऑफ पोर्तुगीज पावर इन इंडियन (1497– 1550), लंडन, 1967.
4.पिसुर्लेकर पी.पी., काकोडकर पी. आर., ट्रान्सलेटेड, द पोर्तुगीज ॲण्ड द मराठाज , स्टेट बोर्ड फॉर लिटरेचर ॲण्ड कल्चर , बॉम्बे , 1975.
5.बेंद्रे वा. सी., पोर्तुगीजांच्या महाराष्ट्रातील हालचाली, मराठा ग्रंथसंग्रहालय, मुंबई, 1967.
6.मोडक बां. प्र., कोल्हापूर राज्याचा इतिहास, कोल्हापूर, 1893.
7.कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठयांचा इतिहास, खंड – 1 ते 3, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1984–86.
8.पिसुर्लेकर पां. सं., पोर्तुगीज – मराठे संबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, 1967.
9. देसाई सं. श., (संपा.), मराठयांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर, खंड –2, मुंबई, 1974.
10. देसाई सं. श., (संपा), करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज, राजहंस प्रेस, न्यु पॅलेस, कोल्हापूर., 1978.
11. शिरोडकर प्र.पा., कोल्हापूर – पोर्तुगीज संबंध, दास्ते वाय. एस.न्यु पॅलेस, कोल्हापूर, 1979.